# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२४**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

## रायगड किल्ल्यावरील रोप वे कर्मचा-यांच्या वेतनात वाढ करणेबाबत

**(१) ३४८७७ (१२-०१-२०२२). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्वराज्याची राजधानी किल्ले रायगड (जि.रायगड) येथील रोप वे कर्मचा-यांच्या वेतनात वाढ करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.२७ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास पर्यटन मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली व त्यांचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१५-०५-२०२४) :** (१) सदर निवेदन प्राप्त झालेले दिसून येत नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ठाणे-अहमदनगर जोडरस्ता सर्वेक्षणास मान्यता मिळाल्याबाबत

**(२) ४६६४८ (२५-०९-२०२२). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हा व अहमदनगर जिल्ह्याला जोडणाऱ्या रस्त्यासाठी लोकप्रतिनिधींच्या सततच्या पाठपुराव्यानंतर दिनांक १५ ऑक्टोबर, २०२२ नंतर निविदा प्रक्रिया पार पडल्या असून सर्वेक्षणाच्या कामाला लवकरच सुरुवात होणार असल्याची माहिती निदर्शनास आली हे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दोन जिल्ह्यांना जोडणाऱ्या शहापूर तालुक्यातील गांडुळवाड-तलवाडा-हिंगळूद ते मेटमार्गे अहमदनगर जिल्ह्यातील घाटघरवाडी-भंडारदरा-शेंडी-मुरशेत या मार्गाने सह्याद्रीच्या खोऱ्यातून सर्वेक्षणाच्या कामाकरिता शहापूर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दोन कोटी पन्नास लाख तर राजूर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दोन कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली हे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्यामुळे शहापुरातील मेट, हिंगळूद, तलवाडा, जांभुळवाड, डोळखांब, पांढरिचा पाडा, वेहळोली, शेणवा ते शहापूर या भागाला लाभ होणार आहे तसेच शिर्डीला जाणाऱ्या भक्तांसाठी सुखकर मार्ग होणार असल्याचे निदर्शनास आले हे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मार्गाकरिता प्रशासकीय मान्यता तसेच सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यास किती कालावधी लागणे अपेक्षित आहे,

(५) असल्यास, सदर काम लवकरात लवकर पूर्ण करुन मंजूरी मिळून त्या ठिकाणचा सर्वांगिण विकास करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१७-०५-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) सदर रस्त्याची काही लांबी वन विभागाच्या अखत्यारीत असलेल्या जागेतून प्रस्तावित केलेली आहे. त्यामुळे सदर मार्गाकरिता संरेखा नक्की झाल्यानंतर प्रकल्पाकरिता लागणारी वनजमिन तसेच खाजगी जमिन यांचे मोजमाप, भूसंपादन, वनजमिन संपादनासाठी वन विभागाची मंजूरी, वनजमिन संपादनाच्या अनुषंगाने संबंधित विभागास पर्यायी जमिन देणे, पर्यावरण विषयक व वन्यजीव विषयक परवानग्या या सर्व बाबी आवश्यक आहेत. ही सर्व कार्यवाही करुन सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यास साधरणतः दोन वर्ष इतका कालावधी लागणे अपेक्षित असून त्यानंतर प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही करण्यात येईल.
(५) सदर रस्त्याची बहुतांश लांबी ठाणे जिल्ह्यातून व काही अहमदनगर जिल्ह्यातुन जाते. सदर मार्गाचे प्राथमिक सर्वेक्षण करुन पर्यायी संरेखन (Alignment) तयार करण्यात आल्या आहे.
पर्यायी संरेखनाचा अभ्यास करुन अंतिम संरेखन नक्की करणे ची कार्यवाही मुख्य अभियंता, सा. बां. प्रादेशिक विभाग, कोकण व मुख्य अभियंता, सा. बां. प्रादेशिक विभाग, नाशिक यांच्यामार्फत कार्यवाही प्रगतीत आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चिपळूण-गुहागर (जि. रत्नागिरी) बायपास रस्ता राष्ट्रीय महामार्ग विभागाकडे हस्तांतरीत करण्याबाबत

**(३) ४९८१७ (१८-०१-२०२३). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय महामार्ग क्र. १६६ ला जोडण्यात आलेला (जि.रत्नागिरी) चिपळूण-गुहागर बायपास रस्ता राष्ट्रीय महामार्ग विभागाकडून काढून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्ता पुन्हा राष्ट्रीय महामार्ग विभागाकडे हस्तांतरित करून महामार्ग क्र. १६६ ला जोडण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली असून याबाबत तात्काळ कार्यवाही करण्याचे आश्वासन सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी दिली हे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, सदर चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१५-०५-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे निवेदन प्राप्त आहे. सदर चिपळूण-गुहागर बायपास रस्ता राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषित होऊन मान्यता मिळावी याकरिताचा प्रस्ताव दि.०८/११/२०२१ रोजी मंजूरीस्तव सादर करण्यात आला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शहापूर-आसनगाव (ता.शहापूर, जि.ठाणे) रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(४) ५०७०९ (१८-०१-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर (जि.ठाणे) येथील मुख्य रस्ता असलेला शहापूर-आसनगाव रस्त्याची मोठया प्रमाणात दुरवस्था झाल्याने अपघाताचे प्रमाण वाढले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याची सार्वजनिक बांधकाम विभागाने ठेकेदारांमार्फत दुरुस्ती करुनही पावसामुळे या रस्त्यावर पुन्हा खड्डे पडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार रस्त्याची त्वरीत दुरुस्ती करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१५-०५-२०२४) :** (१) व (२) अतिवृष्टीमुळे या रस्त्यावर पडलेले खड्डे भरण्यात आले आहेत. सद्यस्थितीत रस्ता वाहतूकीस सुस्थितीत ठेवण्यात आलेला आहे.
(३) शहापूर तालुक्यातील राज्यमार्ग व प्रमुख जिल्हा मार्ग यांची OPRMC तत्वावर ५ वर्षाकरीता देखभाल व दुरुस्ती करणे हे काम प्रगतिपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिचोंडी (ता.येवला, जि.नाशिक) एमआयडीसीला जोडणाऱ्या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत**

**(५) ५६७२३ (२४-०४-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिचोंडी (ता.येवला, जि.नाशिक) या एमआयडीसीला जोडणाऱ्या रस्त्यांची दुरूस्ती करण्याच्या प्रस्तावाला विशेष बाब म्हणून मंजुरी देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक दिनांक २ सप्टेंबर, २०२२ व २० डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रश्न भाग (१) बाबत सार्वजनिक बांधकाम मंडळ, नाशिक यांनी सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांना माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान प्रस्ताव पाठविलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) नुसार चिचोंडी औद्योगिक क्षेत्रासाठी पायाभूत सुविधा उपलब्ध होण्याकरिता या एमआयडीसीला जोडणाऱ्या रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०३-०६-२०२४) :** (१), (२) व (३) हे खरे आहे. मौजे अंगणगाव (MSH-२) ते चिचोंडी खु. साताळी भिंगारे मुखेड सत्यगाव वाकद ते SII-७ तालुका हद्द हा रस्ता इजिमा- १९२ दर्जाचा होता. तद्नंतर, शासन निर्णय दि.२९/०२/२०२४ अन्वये मौजे अंगणगाव (MSH-२) ते चिचोंडी खु. साताळी भिंगारे मुखेड सत्यगाव वाकद ते SH-७ तालुका हद्द हा रस्ता (इजिमा १९२) प्रजिमा २०७ किमी (०/०० से १६/५००) म्हणून दर्जोन्नत करण्यात आला आहे. त्यापैकी ०/०० ते ४/४०० या लांबीत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्या मार्फत रस्ता सुधारणा करण्याचे काम प्रगतीत आहे. किमी ७/२९० से १४/१९० मध्ये मुख्यमंत्री ग्रामसडक योजना अंतर्गत काम झालेले असून देखभाल दुरुस्तीचा कालावधी दि.२७/०२/२०२५ रोजी संपुष्टात येणार आहे. किमी १४/१९० ते १५/८९० ही लांबी सा.बां. विभागाच्या अखत्यारीत आहे. किमी १५/८९० ते १६/१०० मुख्यमंत्री ग्रामसडक योजना अंतर्गत काम झालेले असुन देखभाल दुरुस्तीचा कालावधी दि. २७/०२/२०२५ रोजी संपुष्टात येणार आहे. सदर रस्त्याची सा.बां. विभागाच्या अखत्यारित येणाऱ्या क्षतिग्रस्त लांबीची वार्षिक देखभाल दुरुस्ती कार्यक्रम २०२४-२५ अंतर्गत सुधारणा करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मोर्शी (जि.अमरावती) तालुक्यातील नाल्यांवर तसेच इतर ठिकाणांच्या संरक्षण भिंतीच्या बांधकामाबाबत

**(६) ५७८१४ (२५-०४-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोर्शी (जि.अमरावती) तालुक्यातील विविध नाल्यावर तसेच इतर ठिकाणांच्या संरक्षण भिंतीच्या बांधकामास निधी मंजूर करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी यांना दि. २३ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय ?

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने सदर बांधकामास निधी मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१३-०५-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) राज्यमार्ग क्र.३०३,काटसूर गावाजवळ कि.मी. ४२/८०० मध्ये संरक्षण भिंतीचे बांधकाम एप्रिल २०२४ मध्ये पुर्ण करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर जिल्ह्यातील मुंबई-आग्रा महामार्गाला जोडणाऱ्या वाडा-खर्डी मार्गाची झालेली दुरवस्था

**(७) ५९३३१ (२५-०४-२०२३). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील मुंबई-आग्रा महामार्गाला जोडणाऱ्या वाडा ते खर्डी या ४० किलोमीटरच्या दुपदरी रस्त्याची दुरवस्था झाली आहे, हे खर आहे काय,

(२) असल्यास, वाड्यापासून १० किलोमीटरवर तिल्सेश्वर येथे महाशिवरात्रीच्या यात्रेत जिल्ह्यातून सुमारे ३ लाख भाविक येत असल्याने या भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी सदर रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२८-०५-२०२४) :** (१) व (२) वाडा ते खर्डी हा रस्ता प्रमुख जिल्हा मार्ग दर्जाचा रस्ता आहे. सदर रस्त्यावर वाडा ते टेंभा (बेलवड) ही लांबी देखभाल व दुरुस्तीकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आहे. टेंभा (बेलवड) ते खर्डी ही लांबी देखभाल व दुरुस्तीकरिता बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे आहे. सद्य:स्थितीत सदर रस्ता वाहतूकीस सुस्थितीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाबळेश्वर ( जि.सातारा ) येथे पर्यटकांकरिता रोप-वे उभारणेबाबत

**(८) ६५३७२ (३०-०८-२०२३). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाबळेश्वर (जि.सातारा) येथे पर्यटकांकरिता रोप-वे उभारणी बाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने संबंधित विभागाकडून आवश्यक त्या परवानग्या व ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाली आहेत काय,

(३) असल्यास, रोप-वे उभारणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१७-०५-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) महाबळेश्वर ते प्रतापगड व वेण्णालेक महाबळेश्वर येथे प्रस्तावित रोप वे करिता संबंधित उद्योजकांमार्फत आवश्यक परवानगी प्राप्त करणेची कार्यवाही प्रगतीत आहे.
(३) व (४) सदर कामाकरिता सर्व ना हरकत प्रमाणपत्रे उद्योजकाने प्राप्त केल्यानंतर Maharashtra Aerial Ropeway Act च्या तरतुदी नुसार प्रत्यक्ष काम कार्यान्वित करणेचे नियोजन आहे.

---

## रावेर (जि.जळगाव) तालुक्यातील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(९) ६६१४६ (३१-०८-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रावेर (जि.जळगाव) तालुक्यातील रस्त्यांची मागील अडीच-तीन वर्षापासून दुरवस्था झाली असून या रस्त्याच्या दुरुस्तीला शासनाने स्थगिती दिल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यास्तव अपघातांच्या प्रमाणातही वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रविंद्र चव्हाण (१३-०५-२०२४) :** (१) सा.बां.विभागाच्या शासन पत्र क्र. आर एम आर २०२२/ प्र.क्र.१२४/रस्ते-१,दि.२३.०७.२०२२ अन्वये सा.बां.विभागाच्या अखत्यारितील दि.०१.०४.२०२१ पासून ज्या कामांच्या निविदा मागविण्यात आल्या आहेत, मात्र कार्यादेश दिलेले नाहीत किंवा कार्यादेश देऊनही कामे सुरु झाली नाहीत अशा कामांना स्थगिती देण्यात आली होती. तथापि, सा.बां.विभागाच्या शासन पत्र क्र.आरएमआर २०२२/प्र.क्र.१२४/रस्ते-१, दि.०८.११.२०२३ अन्वये सदरील कामांवरील स्थगिती उठविण्यात आली आहे. सद्यस्थितीत मंजुरी प्राप्त ८ कामांना कार्यारंभ आदेश प्रदान करण्यात आले असून सदरील कामे प्रगतीत आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भुसावळ (जि.जळगांव) येथिल जळगांव ते चितोडगढ महामार्गाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(१०) ६६१८३ (३०-०८-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ (जि.जळगांव) येथील जळगांव ते चितोड महामार्गाचे काम मध्यप्रदेश व राज्यस्थानमध्ये पूर्ण झाले असून ते महाराष्ट्र राज्यात प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेवून सदरील काम तातडीने पूर्ण व्हावे यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२२-०५-२०२४) :** (१) व (२) जळगांव येथुन भुसावळ कडे जाणारा जळगांव भुसावळ हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ (नविन NH-५३) असुन या रस्त्याचे चौपदरीकरणाचे काम NHAI मार्फत झालेले आहे. तसेच भुसावळ येथून रावेर कडे जाणारा अंकलेश्वर – बऱ्हाणपुर रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्र.७५३-BE ला जोडणारा रस्ता आहे. व हा रस्ता पुढे मध्ये प्रदेश कडे जातो. सा.बां. मंडळ, जळगांव अंतर्गत भुसावळ ते NH क्र.७५३-BE हा SH-४४ रस्ता ADB अंतर्गत मंजुर असुन सद्यस्थितीत रस्ता सुस्थितीत आहे. तसेच आमोदा ते ते NH क्र.७५३-BE हा SH-४५ हा रस्ता यापुर्वीच HAM अंतर्गत पूर्ण झालेला असून रस्ता सुस्थितीत आहे. वरील SH-४४ व SH-४५ या दोन्ही रस्त्यांवरुन वाहतुक सुरळीत सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील एम. एच. बी कॉलनी, मालवणी, मालाड (पश्चिम) महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाची २५०० बैठे निवासी गाळे नावावर करण्याबाबत

**(११) ६६२२६ (३१-०८-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील एम. एच. बी कॉलनी, मालवणी, मालाड (पश्चिम) येथे महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळ म्हाडाची २५०० बैठे निवासी गाळे असून सदरच्या बैठे निवासी गाळयांसाठी विक्री योजना राबवून गाळे नावावर हस्तांतरित करण्याची योजना म्हाडाच्या माध्यमातून सन १९९३ मध्ये राबविण्यात आली होती व त्या योजनेत १४२९ बैठे निवासी गाळे म्हाडाने हस्तांतरित केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उर्वरित ११७१ बैठे निवासी गाळे धारकांसाठी विक्री योजना राबवून सदरचे गाळे नावावर हस्तांतरित करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माननीय मुख्यमंत्री मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा गृहनिर्माण मंत्री, वित्त व नियोजन मंत्री यांच्याकडे अनुक्रमे दिनांक १५/१०/२०१८, ०२/०६/२०१९, १५/ ५ /२०२३ रोजी व त्या सुमारास वारंवार मागणी केली आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने बैठे निवासी गाळे नावावर हस्तांतरित करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (३१-०५-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) १०७१ बैठे निवासी गाळे धारकांसाठी विक्री योजना राबविण्याबाबतचा मुद्दा लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी उपस्थित केलेला आहे.

दादासाहेब गायकवाड नगर येथील निवासी गाळयांना दि.१८/५/१९८७ च्या शासन निर्णयाप्रमाणे, बैठे निवासी गाळे विक्री योजना लागू करण्यात आली होती. परंतु, उक्त योजना कालावधीमध्ये फक्त १४२९ गाळेधारकांनी संमती दर्शवून विक्री किंमत भरली. सदर योजनेला योग्य प्रतिसाद प्राप्त झाला नसल्यामुळे शासनाच्या दि.९/१२/१९९८ च्या

आदेशान्वये शिल्लक गाळेधारकांना १९९७ च्या मालकी हक्क योजनेतून वगळण्यात आले. कालांतराने उर्वरीत गाळ्यांबाबत शासनाने दि.९/१२/१९९८ च्या आदेशान्वये विक्री योजना रद्द करुन महाराष्ट्र पोलिस सहकारी गृहनिर्माण महासंघातर्फे पुनर्विकास करण्यास मान्यता दिलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्याअंतर्गत अन्न नागरी पुरवठा विभागातील ५० % पदे रिक्त असल्याबाबत**

**(१२) ६६२७९ (३०-०८-२०२३). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यात पावणे आठ लाख पेक्षा अधिक शिधापत्रिकाधारक असलेल्या पुरवठा विभागाचा कारभार ४५ कर्मचाऱ्यांवर अवलंबून असून पुरवठा विभागाची ५०% पदे रिक्त असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा पुरवठा अधिकारी ते वाहनचालक अशी सुमारे ८४ पदे जिल्हा पुरवठा विभागात मंजूर असतांना प्रत्यक्षात ४५ पदे भरली असल्याचे ही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वर्षभरापासून धान्याची उचल वेळेत होत नसल्याने लाभार्थ्यांना धान्य वेळेवर मिळत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (३०-०४-२०२४) :** (१) व (२) होय, हे अंशतः खरे आहे.

पुणे जिल्ह्यात अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब लाभार्थी योजना मिळून एकूण ९,६१,२८२ शिधापत्रिकाधारक आहेत.

विभागाच्या आकृतीबंधाबाबत शासन शुद्धीपत्रक, दिनांक १५.१२.२०२२ नुसार जिल्हा पुरवठा कार्यालय, पुणे करीता १३३ व अन्नधान्य वितरण कार्यालय, पुणे करीता ७६ मिळून पुणे जिल्ह्याकरीता एकूण २०९ पदे मंजूर करण्यात आली आहेत.

सद्यस्थितीत जिल्हा पुरवठा कार्यालय, पुणे येथे ५९ व अन्नधान्य वितरण कार्यालय, पुणे येथे ४० असे एकूण ९९ अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिंचोटी-भिवंडी (जि.पालघर) या रस्त्याचे नुतनीकरण करण्याबाबत**

**(१३) ६८३८७ (३१-०८-२०२३). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिंचोटी-भिवंडी (जि.पालघर) रस्त्याची दुरवस्था झाल्याने सदर ठिकाणी वारंवार अपघात होत असल्याचे माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, स्थानिक नागरिकांनी उपरोक्त रस्त्याचे नूतनीकरण करण्याची मागणी करुनही शासन स्तरावरुन दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांनी अनेकदा रास्ता रोको आंदोलन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन सदर रस्त्याचे काम, दर्जा सुधारुन रस्त्याचे नूतनीकरण करण्याबाबत शासन स्तरावर कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०७-०५-२०२४) :** (१) व (२) चिचोंटी कामण रस्त्याच्या दुरुस्तीबाबत आंदोलने झाली आहेत, हे खरे आहे.
(३) सदर रस्त्याचे काम खाजगीकरणार्तंगत पूर्ण करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत सदर रस्त्यावरील पथकर वसूली बंद करण्यात आली आहे. आवश्यक देखभाल व दुरुस्तीची कामे सा.बां.विभागामार्फत करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई शहरातील म्हाडाच्या राखीव भूखंडावरील ७० सोसायटयांनी २८०० राखीव सदनिकांची विक्री केल्याबाबत

**(१४) ७१०४५ (१०-१०-२०२३). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरातील म्हाडाच्या राखीव भूखंडावरील ७० सोसायटयांनी राज्य शासन, म्हाडा तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठी राखीव असलेल्या तब्बल २८०० सदनिका परस्पर विकल्याने म्हाडा व राज्य शासनाचे अंदाजे तीन हजार कोटी रूपयांचे नुकसान झाल्याचे निर्दशनास आल्याने मा.उच्च न्यायालयाने तीन महिन्यात चौकशी अहवाल सादर करण्याचे निर्देश दिनांक २८ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास दिले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी केलेल्या चौकशीत काय आढळून आले आहे व तद् नुसार संबंधितांवार कोणती कारवाई केली वा करण्यात आले आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (३१-०५-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीचे वाटप) विनियम, १९८२ च्या विनियम १६ अंतर्गत वितरीत करण्यात आलेल्या म्हाडाच्या भूखंडावरील ६७ सहकारी गृहनिर्माण संस्थांनी म्हाडा, शासन व अनुसूचित जाती/ अनुसूचित जमातींच्या कोट्यातील सदनिका उपलब्ध करुन न दिल्याची बाब मा.उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र. ९/२०१६ अन्वये निदर्शनास आणण्यात आली आहे.

या न्यायालयीन प्रकरणी एक सदस्यीय चौकशी समिती नेमून सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश मा.उच्च न्यायालयाने दि.२८/०६/२०२३ रोजी पारित केलेल्या आदेशात दिलेले आहेत.
(२) मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशास अनुसरुन दि.११.०७.२०२३ रोजीच्या शासन आदेशान्वये एक सदस्यिय चौकशी समिती गठित करण्यात आलेली आहे. सदर चौकशी समितीचा अहवाल मा.उच्च न्यायालयासमोर सादर करण्याची पुढील कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिरूर (का.) ते राजुरी नवगण रस्त्याच्या निकृष्ट दर्जाच्या कामाबाबत

**(१५) ७१४९४ (३१-०८-२०२३). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड विधानसभा मतदार संघामध्ये शिरूर (का.) रायमोहा-राजुरी नवगण रस्त्याचे काम HAM AU-L१ या लेखाशिर्षामधून गत तीन वर्षापासून संथगतीने व निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत येथील नागरीक तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी विभागाकडे तक्रारी केल्या आहेत, हे ही

खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित कंत्राटदार याबाबत हलगर्जीपणा व दर्जा राखण्यात अकार्यक्षम असल्याने तसेच त्यांनी केलेल्या अनियमिततेमुळे सदरील कामास दिरंगाई होवून नागरिकांना अनेक अडचणींना व अपघाताला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२७-०५-२०२४) :** (१) कोविड प्रादुर्भावामुळे कामाच्या प्रगतीवर अंशत: परिणाम झाला हे खरे आहे. सद्यस्थिती ७०% काम पूर्ण झाले असून उर्वरित काम जून २०२४ पर्यन्त पूर्ण करणेचे नियोजन आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने सदर कामाची तपासणी अधिक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांनी दिनांक २९/११/२०२२ रोजी केली आहे. या पाहणीमध्ये दक्षता व गुण नियंत्रण मंडळाकडून नोंदविण्यात आलेल्या त्रुटींची पुर्तता संबंधित कंत्राटदाराकडून स्वखर्चाने करुन घेण्यात आली आहे. उर्वरित त्रुटीची पुर्तता करण्याचे काम प्रगतीत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राष्ट्रीय महामार्गावर प्राण्यांचे मृत्यू रोखण्यासाठी प्रस्तावित उपशमन योजना आणण्याबाबत**

**(१६) ७१७४२ (०१-०३-२०२४). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाहनाच्या धडकेत होणारे वन्य प्राण्यांचे मृत्यू रोखण्यासाठी जंगलाच्या राष्ट्रीय महामार्गावर प्रस्तावित उपशमन योजना महामार्ग प्राधिकरण गांभीर्याने पाहत नसल्याचे दिनांक १२ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गोंदिया -कोहमारा राष्ट्रीय महामार्ग ७५३ वर वाहनाच्या धडकेत वाघाचा मृत्यू झाल्याचे दिनांक ११ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वाहनाच्या धडकेने वन्य प्राण्यांचे होत असलेले मृत्यू रोखण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०३-०६-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) सदर रस्त्याच्या नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पाच्या गाभा क्षेत्रातील लांबीमध्ये वन्यजीव सुरक्षात्मक उपाययोजना तज्ञ वन्यजीव मानद संरक्षक याच्या समवेत माहे ऑगस्ट २०२३ मध्ये संयुक्त पहाणी करण्यात आली व त्यांनी सुचविलेल्या उपशमन योजना कार्यान्वीत करण्याकरीता रस्ते वाहतुक व महामार्ग मंत्रालय यांनी मंजुरी प्रदान केली व सदर महामार्गावर वाहनाच्या धडकेत होणारे वन्य प्राण्यांचे मृत्यु उपशमर्न रोखण्याकरिता उपशमन उपाययोजना म्हणुन रम्बलर स्ट्रीप, कॅट आय, थर्मोप्लास्टिक पेंट, व्याघ्र भ्रमण परिसर असल्याबाबत फलक व वेगमर्यादा फलक लावण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**समृध्दी महामार्गाच्या धर्तीवर ग्रीनफिल्ड महामार्ग कोकण किनारपट्टीवर उभारण्याबाबत**

**(१७) ७१८४५ (०१-०३-२०२४). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.योगेशदादा कदम (दापोली), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेवस - रेडी सागरी महामार्ग, मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग मागील अनेक वर्षांपासून अपूर्णावस्थेत असताना राज्य सरकारने समृध्दी महामार्गाच्या धर्तीवर ३८८.४५ किमी लांबीचा ग्रीनफिल्ड महामार्ग कोकणच्या किनारट्टीवर उभारण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची ग्रीनफिल्ड प्रकल्पाकरिता अंमलबजावणी संस्था म्हणून नेमणूक करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तत्कालीन नगरविकास मंत्री यांनी दिनांक १४ मार्च, २०२२ रोजी विधिमंडळात यासंदर्भात घोषणा केली होती, हा महामार्ग आंतरराष्ट्रीय विमानतळास जोडला जाणार असल्याने कोकणातून आंतरराष्ट्रीय प्रवास सोयीचा होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू ग्रीनफिल्ड महामार्ग प्रकल्पाचे थोडक्यात स्वरूप काय आहे, तसेच सदर महामार्गाच्या कामास केव्हापासून सुरुवात होणार आहे व किती कालावधीत हे काम पूर्ण होणार असून प्रत्यक्षात वाहतुकीसाठी कधी कार्यान्वित होणार आहे,

(५) उक्त प्रकल्पासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (३१-०५-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) सदरचा रस्ता रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील बलवली गावापासून सुरु होत असून तो गोवा राज्य सिमेजवळ पत्रादेवी जिल्हा सिंधुदुर्ग पर्यंत प्रस्तावित आहे.

सदरचा रस्ता प्रवेश नियंत्रित सहापदरी ग्रीनफिल्ड द्रुतगती मार्ग असून १०० कि.मी प्रती तास वेगासाठी महामार्गाचे संकल्पन करण्यात आले आहे.

सदर महामार्गासाठी एकूण ३८८.४५ कि.मी. लांबीत १०० मी रुंदीने भूसंपादन करण्याचे प्रयोजन आहे. सद्यस्थितीत कलम ३ ची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली असून प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(५) प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याचे काम प्रगतीपथावर असून त्यास मंजूरी मिळाल्यानंतर महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत अथसहाय्य उभारणीसह भूसंपादनाची कार्यवाही पुर्ण करुन महामार्गाचे काम हाती घेणे प्रस्तावित आहे.

---

**मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील संगमेश्वर आणि माभळे गावांना जोडणाऱ्या सोनवी नदीवरील पुलाचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(१८) ७२२३९ (०४-०३-२०२४). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील संगमेश्वर आणि माभळे गावांना जोडणाऱ्या ब्रिटीश कालीन सन १९३२ मध्ये उभारण्यात आलेल्या सोनवी नदीवरील ९२ वर्षांच्या नवीन पुलाच्या उभारणीचे काम मागील २ वर्षांपासून ठप्प झालेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत ५० टन वजन घेऊन माल वाहतूक करणारे अवजड ट्रक सोनवी पुलावरुन जाताच पुलाला हादरे बसत आहेत, या पुलावरुन प्रवासी जाता-येता जीव मुठीत घेऊन जात आहेत, तसेच महामार्गाच्या चौपदरीकरणाची घोषणा होऊन ज्यावेळी प्रत्यक्ष कामाला प्रारंभ झाला त्यावेळी सोनवी पुलाला नवीन पर्यायी पुल मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चौपदरीकरणाच्या कामाला १२ वर्षांपूर्वी सुरुवात झाली असली तरी नवीन सोनवी पुलाचे काम दोन वर्षांपूर्वी हाती घेण्यात आले होते, मात्र जूनमध्ये बंद झालेले पूलाचे काम गेली २ वर्षे ठप्प असून पूलाजवळच संगमेश्वरचे बस स्थानक असून पूल अरुंद असल्याने पूलाच्या दोन्ही बाजूला वाहतूक कोंडी होत असल्याने संगमेश्वर आणि माभळे वासियांमध्ये तीव्र नाराजी आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त सर्व अडचणी लक्षात घेता पुलाचे काम जलद गतीने होणे अपेक्षित असतानाही पुलाचे काम बंद असण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०८-०५-२०२४) :** (१) हे खरे नाही,

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणांतर्गत सोनवी नदीवरील प्रस्तावित नवीन पुलाचा पाया व खांब यांचे ७०% काम पूर्ण झाले आहे, उर्वरीत खांबाचे बांधकाम, व पुलाच्या स्लॅब चे काम प्रगतीपथावर आहे.
(२) हे अंशतः खरे आहे,

सदरचा पूल हा ब्रिटीश कालीन पूल असुन ९२ वर्षांपूर्वी पासुन ५० टन वा त्याहुन अधिक अवजड वाहने त्यावरुन जाताना हादरे बसतात. परंतु पुल सुस्थितीत असुन अवजड वाहनांमुळे पुलाला धोका नाही आणि चौपदरीकरणाअंतर्गत सोनवी पुलाच्या दोन्ही बाजुकडील नविन पुलाचे काम प्रगतीत असुन लवकरच पुर्ण करण्यात येत असल्याने सोनवी पुलाला नवीन पर्यायी पुल मिळणार आहे.
(३) हे खरे नाही,

सोनवी पुलालगत संगमेश्वर व माभळे गावातील भूसंपादन व खोके धारकांचे प्रश्न तसेच संगमेश्वर पुलाकडील दोन्ही बाजुकडील आराखड्या बाबत स्थानिकांची निवेदने व मागण्या यामुळे संपादीत जागेचा ताबा मिळण्यास झालेल्या विलंबामुळे काम कंत्राटदाराकडून उशिरा हाती घेण्यात आले होते. तथापि वाहतुक पोलीस चौकी पुलाजवळ असल्यामुळे मोठ्या प्रमाणावर वाहतुक कोंडी होत नाही.

माभळे वासियांतर्फे सदर पुलावरील वाहतुक कोंडीबाबत या विभागाकडे नाराजी व्यक्त करणारे निवेदन प्राप्त नाही. पुलाजवळ संगमेश्वर मुख्य बाजारपेठ व बसस्थानक, राज्यमार्ग व राष्ट्रीय महामार्ग या चार रस्त्यांचे जंक्शन असल्याने वाहनांची वर्दळ असते, नवीन पुलाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर वाहतुक कोंडीचा प्रश्न उद्भवणार नाही.
(४) व (५) सोनवी पुलाच्या दोन्ही बाजूस दोन नवीन पुलांचे काम प्रगती पथावर असून पावसाळयापूर्वी पुलाचे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मुंबईतील अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे स्मारक उभारण्याबाबत

**(१९) ७२३७५ (०५-०३-२०२४). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर), ॲड.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे स्मारक उभारण्याचा निर्णय शासनाने घेऊन या शिवस्मारकाचे जलपूजन मा.पंतप्रधान महोदयांचे शुभहस्ते करण्यांत येऊन त्यास ९ वर्षे इतका कालावधी लोटला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ९ वर्षे इतका कालावधी होऊनही शिवस्मारकाच्या पुढील कामाबाबत अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे दिनांक २७ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्मारकाचे काम प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत व दरम्यानच्या काळात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (२२-०५-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) होय, हे खरे आहे.
मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या ०२ विशेष अनुमती याचिका व तद्नंतर दाखल झालेली ०१ रीट याचिका या तिन्ही याचिकांच्या दिनांक ०३/०३/२०२० रोजीच्या एकत्रित सुनावणी नंतर मा. सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका निकाली काढल्या व रिट याचिका सुनावणीसाठी मा.मुंबई उच्च न्यायालयामध्ये दाखल मूळ जनहित याचिकांसोबत (PIL ५८/२०१७ व PIL ०८/१८) चालविण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार या सर्व याचिकांचे प्रतिवादी यांच्यातर्फे न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करण्यात येत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रतिज्ञापत्र मा. न्यायालयात सादर करण्यात आले असून इतर प्रतिवादींची प्रतिज्ञापत्रेही मा. उच्च न्यायालयात सादर करण्यात येत आहेत, मा. न्यायालयाने सुनावणीची तारीख अद्याप जारी केलेली नाही.
(४) सदर प्रकल्प न्याय प्रविष्ठ आहे.

---

## जव्हार व मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील पुलाचे कठडे अतिवृष्टीत वाहून गेल्याबाबत

**(२०) ७२३९८ (०४-०३-२०२४). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत (ता.जव्हार व मोखाडा, जि.पालघर) धोकादायक पूलाची पाहणी करून सर्व्हेक्षण केले असता माहे जुलै-ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान कोसळलेल्या मुसळधार पावसाने पूलाचे कठडे वाहून गेल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे जुलै-ऑगस्टच्या अतिवृष्टीमुळे काही गावांचा संपर्क तुटल्याने जव्हार सार्वजनिक बांधकाम उपविभागाकडून गावांचे सर्वेक्षण करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) सदर धोकादायक पुलाचे सर्व्हेक्षण करण्यात आले असल्यास, किती पुल धोकादायक आहेत तसेच मंजूर होणाऱ्या पुलाच्या कामात गैरव्यवहार झाला असून त्याची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी स्थानिकांकडून करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२८-०५-२०२४) :** (१) हे खरे नाही. माहे जुलै ऑगस्ट - २०२३ मधील अतिवृष्टी मध्ये जव्हार आणि मोखाडा तालुक्याच्या परिसरातील पुलाचे कठडे पावसात वाहून गेलेले नाहीत.
(२) सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत गावांचे सर्वेक्षण करण्यात येत नाही.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कृषी उत्पन्न बाजार समिती, पुणे येथील पार्किंगमधील जागेमध्ये मत्स्य व्यवसायाला स्थानिक जैन व्यापाऱ्यांनी व नागरिकांनी विरोध दर्शविल्याबाबत

**(२१) ७२५६५ (१३-०२-२०२४). श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.राजेश एकडे (मलकापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील कृषी उत्पन्न बाजार समिती पार्किंगमधील जागा फिश मार्केट व पोल्ट्री व्यवसायाला देण्याचा निर्णय बाजार समितीने घेतला असून या निर्णयास स्थानिक जैन व्यापाऱ्यांकडून तसेच परिसरातील नागरीकांनीही विरोध करुन आंदोलन करण्याचा इशारा दिला असल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०६-०५-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) कृषि उत्पन्न बाजार समिती, पुणे येथील पोल्ट्री व फिश मार्केटचा प्रस्ताव रद्द करण्याबाबतचे अध्यक्ष, दि पूना मर्चंट्स चेंबर, पुणे यांचे दि.०८.०९.२०२३ रोजीचे पत्र प्राप्त झाले आहे.

सदर पत्र पणन संचालक यांना पाठविण्यात आले असून त्यांनी दि.१८.०९.२०२३ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे (ग्रामीण) यांना योग्य ती कार्यवाही करण्याबाबत कळविले आहे.

परंतु पुणे येथील कृषी उत्पन्न बाजार समिती पार्किंगमधील जागा फिश मार्केट व पोल्ट्री व्यवसायाला देण्याबाबतचा प्रस्ताव शासनस्तरावर प्राप्त झालेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई-बंगळुरु महामार्गावरील चांदणी चौकात होणाऱ्या वाहतुक कोंडीबाबत

**(२२) ७२५६९ (०५-०३-२०२४). श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.राजेश एकडे (मलकापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-बंगळुरु महामार्गावरील चांदणी चौकात होणाऱ्या वाहतुक कोंडीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून (एनएचएआय) कोटयवधी रुपये खर्च करुन जुना पुल पाडून नवीन उड्डाणपूल उभारण्यात आला, परंतु अद्यापही या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी कायम असून पादचाऱ्यांसाठी कुठलीच सोय नसल्याचे दिनांक ८ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी वाहनचालकांकडून सक्त वाहतूक नियमावली राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०३-०६-२०२४) :** (१) हे ,खरे नाही.

सदर राष्ट्रीय महामार्ग केंद्र प्रशासनाचे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे अखत्यारित येतो. वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी या परिसरातील अस्तित्वातील जुना पूल पाडून नवीन उड्डाणपुलाचे काम पुर्ण झाले असून वाहतुकीसाठी खुला करण्यात आले आहे. तसेच सर्व ८ मार्गिकांचे काम पुर्ण झाले असून वाहतुकीसाठी सुरु करण्यात आलेला असुन सदर रस्त्यावरील वाहतुक सुरळीत आहे. पादचाऱ्यांकरिता आवश्यक त्या ठिकाणी पादचारी मार्गाची तरतुद केलेली आहे. तसेच अतिरिक्त पादचारी पुलाच्या प्रस्तावास नुकतीच मंजुरी मिळाली असून निविदा प्रक्रीया प्रगतीत आहे.

(२) वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी उभारण्यात आलेला प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर आवश्यक त्या ठिकाणी २१ सूचना फलक, १३ मोठे गॅन्ट्री फलक, लेन मार्कींग व सुरक्षेच्या दृष्टीने आय.आर.सी. मानकाप्रमाणे सर्व तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. याव्यतिरिक्त वाहतुक नियमावलीचे पालन करण्यासाठी वाहतुक पोलिस यंत्रणा कार्यरत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औसा ते मुरुड (जि.लातूर, ता.औसा) हा मुख्य प्रवासी मार्गाची दुरूस्ती करण्याबाबत

**(२३) ७२८०२ (०५-०३-२०२४). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), अ‍ॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा ते मुरुड (जि.लातूर, ता.औसा) हा मुख्य प्रवासी वाहतुकीचा मोठा मार्ग असल्याने वाहनांची वर्दळ होत असून या मार्गावर रस्त्याची दुरवस्था झाल्याने हा मार्ग मृत्यूचा महामार्ग बनल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मार्गावर अपघातांचे प्रमाण वाढले असून गंभीर जखमी होण्याचेही प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत वा नवीन रस्ता बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१६-०५-२०२४) :** (१) हे खरे नाही

(२) हे खरे नाही

(३) प्रश्नांकीत रस्ता अंबाजोगाई-देवळा-मुरुड जिल्हा सरहद्द रा. मा.- २११ सा. क्र. १०४/५०० ते १०९/५०० असे ५.०० कि.मी. व मुरुड- गुंफावाडी- तावरजखेडा- कोंड- भेटा- भादा- औसा राज्यमार्ग- २३९ सा. क्र. २९/६०० ते ५४/६०० असे २५.०० कि.मी. अशी एकूण ३०.०० कि.मी. लांबी आहे.

त्यापैकी रा. मा.-२११ सा. क्र. १०४/५०० ते १०९/५०० ह्या लांबीत सन २०२३-२४ रस्ते वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत सदर रस्ता खड्डे भरुन सुस्थितीत ठेवण्यात आलेला आहे. राज्यमार्ग -२३९ सा. क्र. २९/६०० ते ५४/६०० ह्या लांबीत सन-२०२२-२०२३ मध्ये रस्त्याची सुधारणा व पुलाचे बांधकाम करिता एकुण रु.१०००.०० लक्ष व विशेष दुरुस्ती अंतर्गत एक काम रु.२००.०० लक्ष तसेच सन २०२३-२४ मध्ये रु.३०५०.०० लक्ष किमंतीची कामे मंजूर असून निधी उपलब्धते नुसार पूर्ण करणेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भुसावळ शहरातील गांधी पुतळा ते यावल रोड तापी नदी पुलाची झालेली दुरवस्था**

**(२४) ७२९३५ (१५-०२-२०२४). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ शहरातील गांधी पुतळ्या ते यावल रोड तापी नदी पुलावर खड्डे पडले असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच पुलाच्या दोन गाळयांना जोडणाऱ्या तांब्याच्या प्लेट उघड्या पडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर पुलावरील खड्डे बुजविण्यासाठी व पुलाच्या दोन गाळयांना जोडणाऱ्या तांब्याच्या प्लेट झाकण्यासाठी तातडीची कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१३-०५-२०२४) :** (१) भुसावळ शहरातील गांधी पुतळा ते यावल रोड ते तापी नदी पुलाला जोडणारा रस्ता हा राज्यमार्ग क्र.४४ असून सदर रस्त्यावर किरकोळ स्वरुपात खड्डे असल्याची बाब निदर्शनास आल्यानंतर सदर खड्डे भरण्यात आले आहेत.

(२) हे खरे नाही.

(३)सदर पुलावरील खड्डे भरण्यात आले असून दोन गाळयांना जोडणारे Expansion Joint सुस्थितीत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वर्धा (ता.तिवसा, जि.अमरावती) येथील नदीच्या पात्रात नमस्कारी ते भारसवाड गावाच्या दरम्यान पुल बांधण्याबाबत**

**(२५) ७२९६९ (२९-०२-२०२४). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा (ता. तिवसा, जि.अमरावती) येथील नदीच्या पात्रात नमस्कारी ते भारसवाड गावाच्या दरम्यान पुल बांधण्यासाठी नागरिकांनी वारंवार मागणी केल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी पुल नसल्यामुळे या भागातील विद्यार्थ्यांचे व नागरिकांचे पावसामध्ये प्रचंड हाल होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ठिकाणी पुल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१५-०५-२०२४) :** (१) होय

(२) नमस्कारी येथून भारसवाड येथे जाण्यासाठी सद्य:स्थितीत चिस्तुर-आनंदवाडी मार्गे पर्यायी मार्ग आहे.

(३) व (४) पूलाचे बांधकाम निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

---

## पुरंदर (जि.पुणे) येथील संत ज्ञानेश्वर महाराज पालखी महामार्गाचे विस्तारीकरणाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(२६) ७३०६० (०५-०३-२०२४). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुरंदर (जि.पुणे) येथील संत ज्ञानेश्वर महाराज पालखी महामार्गाचे विस्तारीकरणाचे काम सुरु असून ते काम अतिशय निष्कृष्ट दर्जाचे झाल्याने त्या रस्त्यावर खड्डे पडल्याने अनेक वेळा अपघात होत असल्याने जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे काम लवकरात लवकर पूर्ण करुन खड्डे मुक्त रस्ता करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०३-०६-२०२४) :** (१) हे खरे नाही.

सदर महामार्ग हा केंद्रशासनाचे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे अखत्यारीत आहे. सदर रस्त्याच्या ज्या लांबीमध्ये काम सुरु नाही, त्याभागामध्ये काही ठिकाणी पावसाळयामध्ये पडलेल्या खड्डयांची त्वरीत दुरुस्ती करुन रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आलेला आहे. तसेच वेळोवेळी रस्त्याची देखभाल व दुरुस्ती केली जाते. सदर रस्त्याचे काम भारतीय रस्ते आय. आर. सी. मानकाप्रमाणे सुरु असून कामाची गुणवत्ता तपासणी नियमितपणे करण्यात येते. महामार्गावर खड्डयांमुळे अपघात झाले आहेत अशी बाब निदर्शनास आली नाही.

(२) सदर काम पुर्ण करण्याच्या विहित कालावधी नुसार मे, २०२४ मध्ये काम पूर्ण करण्याचे नियोजन होते. परंतु कामाच्या मंजूर मुळ वावामध्ये झालेली वाढ, काही ठिकाणी प्रलंबित असलेले भूसंपादन, अतिरिक्त उच्च दाबाच्या विद्युत वाहीन्या स्थलांतरणातील अडचणींमुळे सदर प्रकल्पाचे काम नोव्हेंबर, २०२४ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रत्नागिरी जिल्हा परिषदेतील शिक्षणाधिकारी पद रिक्त असल्याबाबत

**(२७) ७३३०९ (२८-०२-२०२४). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हा परिषदेतील शिक्षणाधिकारी पद गेल्या ३-४ महिन्यापासून रिक्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यातील ९ तालुक्यांपैकी ७ तालुक्यांना गट शिक्षणाधिकारी नाहीत, तसेच तीन उपशिक्षणाधिकाऱ्यांपैकी २ पदे गेल्या अनेक महिन्यांपासून रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (२८-०५-२०२४) :** (१) हे खरे आहे. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद रत्नागिरी हे पद भरण्यात आले आहे.

(२) हे अशंत: खरे आहे. रत्नागिरी तालुका येथे गट शिक्षणाधिकारी कार्यरत आहे. अन्य ८ ठिकाणी विस्तार अधिकारी यांना अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे. तसेच रत्नागिरी प्राथमिक शिक्षण विभागात उपशिक्षणाधिकारी संवर्गाची २ पदे मंजूर असून त्यापैकी एक पद भरलेले आहे.

(३) सद्य: स्थितीत सरळसेवेने पदभरती तसेच पदोन्नतीने व बदलीने पदस्थापना देणेबाबत कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जत (जि.सांगली) या तालुक्याच्या रस्त्याला अर्थसंकल्पात निधी मिळण्याबाबत

**(२८) ७३३७१ (०१-०३-२०२४). श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुभाष धोटे (राजूरा), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जत (जि.सांगली) तालुक्यात विविध मागण्यांसाठी क्रांती दिनी म्हणजेच दिनांक ९ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास जत उमदी रोडवरील सोन्याळ फाटा येथे चिक्कलगी भुयार मठाचे मठाधिपती, श्री. संत बागडेबाबा मानव मित्र संघटनेचे सर्वेसर्वा तुकाराम बाबा महाराज यांच्या नेतृत्वाखाली रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याकरीता रास्ता रोको आंदोलन केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याला लांबीनुसार निधी मिळणे गरजेचे असतांना यावर्षी अर्थसंकल्पात निधी मिळाला नसल्याने रस्ताच्या दुरुस्तीच्या कामास स्थगिती दिल्याने रस्त्याचे काम होऊ शकले नसल्याने सातत्याने अपघात होत असून वर्षभरात १८ जणांचे बळी गेल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त रस्त्याची दुरुस्ती करुन होणारे अपघात रोखण्यासाठी तसेच धोकादायक विहिरीस संरक्षक भिंत बांधून वाहतूक सुरळीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (३०-०५-२०२४) :** (१) होय, खरे आहे.
(२) शासनाचे दि.२३/०७/२०२२ च्या पत्रान्वये सा.बां.विभागातंर्गत कामावर देण्यात आलेली स्थगिती शासन पत्र दि.०८/११/२०२३ अन्वये उठविण्यात आली आहे.
मार्च २०२३ च्या अर्थसंकल्पात रक्कम रु.२५०० लक्षची मंजूर ७ काम प्रगतीत आहे. डिसेंबर २०२३ च्या अर्थसंकल्पात रक्कम रु.२५०० लक्षची मंजूर ११ काम प्रगतीत आहे. सन २०२३-२४ मध्ये वार्षिक देखभाल दुरुस्ती अंतर्गत रु.१३८८.०४ लक्षची ३८ कामे मंजूर असून सदरची कामे प्रगतीपथावर आहेत.
क्षतिग्रस्त रस्त्यामुळे अपघात झाल्याची नोंद नाही.
(३) राज्य मार्ग क्र.३८५ सा.क्र. कि.मी ५/१०० येथे विहिरीलगत संरक्षक भिंतीचे काम प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सुत्रकारा, पाटीलपाडा, वेडगापाडा (ता.तलासरी, जि.पालघर) या गावासाठी काळूनदीवर पूल बांधण्याबाबत

**(२९) ७३९१६ (०४-०३-२०२४). श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सुत्रकारा, पाटीलपाडा, वेडगापाडा (ता.तलासरी, जि.पालघर) या गावातील शालेय विद्यार्थी, शेतकरी, तसेच ग्रामस्थांना येण्याजाण्यासाठी जीव धोक्यात घालून काळू नदीच्या पाण्यातून नदी ओलांडून पलीकडे जावे लागत आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ग्रामस्थांना मृतदेह अंत्यविधीसाठी काळू नदीच्या पाण्यातून जीव धोक्यात घालून नदी ओलांडून पलीकडे जावे लागत असल्याने तेथील ग्रामस्थांनी काळू नदीवर पुल बांधण्यासाठी शासनाकडे दिनांक २३ जुलै, २०२३

रोजी वा त्यासुमारास सादर केलेला प्रस्ताव प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने उक्त प्रस्तावावर तातडीने निर्णय घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२४-०५-२०२४) :** (१) होय.
(२), (३) व (४) सदर ठिकाणी नवीन पुलाचे बांधकाम करण्यास निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून काम हाती घेण्याचे नियोजन राहील.

---

**उमरखेड येथे कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतकरी भवन मंजूर करुन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३०) ७४०१२ (१४-०२-२०२४). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमरखेड येथे कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतकरी भवन मंजूर करुन निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव तात्काळ सादर करण्याकरिता सह संचालक (पणन) महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिनांक १० ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्या सुमारास जिल्हा उप निबंधक, सहकार संस्था, यवतमाळ यांना पत्र दिले होते हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या पत्रानुसार सदरील प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, काय हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रस्तावास निधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०७-०५-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) सहसंचालक (पणन), पुणे यांच्या दि.१०.०८.२०२३ च्या पत्रानुसार, उमरखेड येथे शेतकरी भवन मंजूर करणेबाबत कृषि उत्पन्न बाजार समितीकडून सहायक निबंधक, सहकारी संस्था, उमरखेड यांना प्रस्ताव प्राप्त झालेला नाही.
दरम्यान, राज्यातील ज्या कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतकरी भवन उपलब्ध नाही तेथे नवीन शेतकरी भवन बांधणे व अस्तित्वातील शेतकरी भवनाची दुरुस्ती करणे यासाठी “राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन बांधणे” या योजनेस दि.१९.१२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.
सदर योजनेंतर्गत कृषि उत्पन्न बाजार समिती, उमरखेड, जि.यवतमाळ यांच्याकडून शेतकरी भवन मंजूर करणेचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्यावर कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‍भवत नाही.
४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**राष्ट्रीय महामार्ग ९६५ (ता.मंडणगड, जि.रत्नागिरी) येथील शेतकऱ्यांना भूसंपादनाची रक्कम न दिल्याबाबत**

**(३१) ७४०८७ (०५-०३-२०२४). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय महामार्ग ९६५ (ता.मंडणगड, जि.रत्नागिरी) या रस्त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने भूसंपादन केले असून शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत भूसंपादनाची रक्कम देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रक्कम मिळण्याकरिता तेथील शेतकऱ्यांनी अनेक वेळा आंदोलने केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शेतकऱ्यांना भूसंपादनाची रक्कम मिळण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०२-०५-२०२४) :** (१) हे खरे नाही.

राष्ट्रीय भूसंपादन कायदा १९५६ नुसार मंडणगड तालुक्यातील एकुण ९.८२७ आर. हेक्टर क्षेत्रापैकी ३.०२७ आर. हेक्टर क्षेत्राची निवाडा रक्कम मंजूर करण्यात आलेली आहे. मंजुर निवाड्यापैकी मोबदला रक्कम रु.३,४८,५६,३३२/- शेतकऱ्यांना वाटप करण्यात आली असून उर्वरित मोबदला वाटपाची प्रक्रिया सक्षम प्राधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, दापोली यांचेमार्फत प्रगतीत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर रस्त्याच्या दुपदरीकरणाचे काम हे भूमी अभिलेख मंडणगड यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या नकाशानुसार अस्तित्वात असलेल्या रस्त्याच्या हद्दीमध्ये सुरु आहे. तसेच अस्तित्वात असलेल्या रस्त्याच्या रुंदीपेक्षा जास्त लागणाऱ्या जागेकरिता राष्ट्रीय महामार्ग भूसंपादन कायदा १९५६ नुसार भूसंपादन प्रकीया सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बांदा (जि.सिंधुदुर्ग) येथील महामार्गावर प्रस्तावित उड्डाणपुलाचे काम परस्पर आराखडा बदलून सुरु केल्याबाबत

**(३२) ७४१८० (०४-०३-२०२४). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बांदा (जि.सिंधुदूर्ग) येथील महामार्गावर प्रस्तावित उड्डाणपुलाचे काम परस्पर आराखडा बदलून सुरु करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक भूधारक व ग्रामपंचायतीला कोणतीही कल्पना न देता आराखडा बदलून काम सुरु केल्याने ग्रामस्थांनी माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान काम बंद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी आराखडा बदलून उड्डाणपुलाचे काम करणाऱ्या दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०८-०५-२०२४) :** (१) हे, खरे नाही.

सिंधुदुर्ग जिल्हयातील रा.म. क्र. ६६ वर बांदा येथील उड्डाणपूलाचे काम ई. पी. सी. तत्वावर निविदा मागवून मंजूर निविदेतील संकल्पनानुसार प्रगतीत आहे.

(२) हे खरे नाही.

ई. पी.सी. तत्वावरील मंजूर निविदेतील संकल्पनानुसार उड्डाणपुलाची लांबी- रुंदी व सेवा रस्त्यांची लांबी- रुंदी यामध्ये कोणाताही बदल केलेला नाही. उड्डाणपुलाच्या लांबी- रुंदी मध्ये बदल न केल्याचे निदर्शनास आणुन दिल्यानंतर स्थानिक ग्रामस्थांचे समाधान झालेले असून सद्यस्थितीत काम सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मालवण (जि.सिंधुदुर्ग) येथील तहसीलदार निवासस्थानाच्या इमारतीचे बांधकाम अपूर्ण असल्याबाबत

**(३३) ७४१९२ (०५-०३-२०२४). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण (जि.सिंधुदुर्ग) येथील तहसीलदार निवासस्थानाच्या इमारतीच्या बांधकामाला परवानगी मिळून १० वर्षांचा कालावधी होऊनही अद्याप सदर निवासस्थानाचे काम अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीच्या बांधकामाला लाखो रुपये खर्च करुनही निवासस्थानाकडे जायला मोठा रस्ता नसून निवासस्थानाच्या इमारतीत दरवाजे, खिडक्या, वीज जोडणी आणि रंगरंगोटी अशी अनेक कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तहसिलदार निवासस्थानाचे काम संथगतीने सुरु असण्याची कारणे काय आहेत व त्यास जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२२-०५-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे

(२), (३) व (४)

सद्यस्थितीत तहसिलदार निवासस्थान इमारतीचे बांधकाम बहुतांश पूर्ण झालेले असून दरवाजे व खिडक्या बसविणे, रंगकाम करणे ही कामे प्रलंबित आहेत. सदर जागेवर काम चालू असतानाच लगतचे जागामालक यांचेकडून जागेमध्ये आवार भिंतीचे बांधकाम करण्यात आले. त्यामुळे प्रस्तावित तहसीलदार निवासस्थानाकडे ये जा करणेसाठी पोचमार्ग उपलब्ध होत नव्हता. त्याअनुषंगाने तहसिलदार मालवण यांनी त्यांचे पत्र क्र. प्रशा तहसिलदार निवासस्थान/रस्ता/०६/२०२३, दि.२३.०६.२०२३ अन्वये सदर जागेची मोजणी करुन मिळणेसाठी अधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, मालवण यांना कळविले. तसेच तहसिलदार मालवण यांनी त्यांचे पत्र क्र. प्रशा तहसिलदार निवासस्थान / रस्ता /०६ / २०२३/२२७, दि.२३.०६.२०२३ अन्वये मुख्याधिकारी, नगरपरिषद मालवण यांचेकडे सदर निवासस्थानाकडे जाणारा रस्ता मोकळा करुन अथवा पर्यायी रस्ता मिळणेसाठी मागणी केली. परंतु तदनंतर पुन:श्च उपविभागीय कार्यालय, मालवण यांचे पत्र क्र. जा.क्र. ११२, दि. २४/०१/२०२४ अन्वये पर्यायी रस्ता मिळणेसाठी मा.तहसीलदार मालवण यांचेकडे मागणी केली आहे. परंतू अद्याप पर्यंत सदर जागेची मोजणी व सीमांकन नकाशे उपविभागीय कार्यालय, मालवण यांना उपलब्ध झालेले नाहीत. अथवा अस्तित्वातील रस्ता मोकळा करुन मिळालेला नाही किंवा पर्यायी रस्ता देखील उपलब्ध झालेला नाही. त्यामुळे सदर ठिकाणी पुढील काम सुरू करणे शक्य होत नाही. सबब, सार्वजनिक बांधकाम विभाग विलंबास जबाबदार नाही.

---

## वर्धा जिल्ह्यातील राज्य महामार्गाची झालेली दुरवस्था

**(३४) ७४७४४ (०५-०३-२०२४). श्री.रणजीत कांबळे (देवळी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्ह्यातील वायगाव ते देवळी राज्य महामार्ग ३२२, शिरुड ते अल्लीपूर राज्य महामार्ग ३३४, आंजी ते मांडवा राज्य महामार्ग ३२४, मांडवा ते उमरी (मेघे) राज्य महामार्ग ३४ हे रस्ते महत्त्वाचे असून देखील सद्य:स्थितीत अतिशय बिकट अवस्थेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्ते अतिशय खराब अवस्थेमध्ये असल्याने अपघाताचे प्रमाण देखील वाढले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील ५ वर्षात या रस्त्यावर कुठल्याही प्रकारचे काम झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने या रस्त्यांसाठी निधी उपलब्ध करुन देऊन रस्त्याचे काम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०७-०५-२०२४) :** (१) सदर रस्त्यांची देखभाल व दुरुस्तीची कामे वेळोवेळी करुन रस्ते वाहतुकीकरिता सुस्थितीत ठेवण्यात आले आहेत. तथापि, देखभाल दुरुस्ती अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती करुन, रस्ते वाहतूकीस योग्य करण्यात आलेले आहेत.
(२) व (३) नाही.
(४) i) वर्धा जिल्ह्यातील वायगाव ते देवळी राज्यमार्ग क्र. ३२२ या रस्त्यावर सा.क्र. कि. मी. १८/०० ते ३०/५०० या लांबीत रस्ता सुधारणा करण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे.
ii) शिरुड ते अल्लीपूर राज्यमार्ग क्र. ३३४ या रस्त्यावर सा.क्र. कि.मी. ०/०० ते १७/०० या लांबीत सा.क्र. कि.मी. ३/१०० मधील पुलाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. कि.मी.०/०० ते २/५०० व कि.मी. ३/०० ते ७/०० या लांबीमध्ये रस्ता सुधारणेची कामे प्रगतीत आहे. कि.मी. १०/०० ते १६/०० मध्ये अभियांत्रिकी सुधारणा व रिटेनिंग वॉलचे बांधकाम काम प्रगतीत आहे.
iii) आंजी ते मांडवा हा राज्यमार्ग क्र.३२५ या रस्त्यावर सा.क्र. कि.मी. ८३/०० ते ९४/५०० या लांबीत वार्षिक देखभाल दुरुस्ती अंतर्गत दुरुस्ती करण्यात येऊन रस्ता वाहतुकी योग्य ठेवण्यात आला आहे.
iv) मांडवा ते उमरी (मेघे) प्रजिमा क्र.३४ या रस्त्यावर सा.क्र. कि.मी. ०/० ते ३/५००कि. मी.,५/४०० ते ६/१०० व कि.मी १०/०० ते ११/५०० या लांबीत कामे पूर्ण करण्यात आली आहेत. उर्वरित लांबीत वार्षिक देखभाल दुरुस्ती अंतर्गत दुरुस्ती करण्यात येऊन रस्ता वाहतुकी योग्य ठेवण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील नागपूर-गोवा समृध्दी महामार्गाची मार्गिका (दिशा) कोल्हापूर-गारगोटी पाटगांव अंजिवडे-धुऱ्याचीवाडी-माणगांव-सावंतवाडी मार्गे गोवा असा प्रस्तावित करणेबाबत**

**(३५) ७५०२८ (०५-०३-२०२४). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (M.S.R.D.C.) यांचेमार्फत राज्यात ५ हजार किलो मीटर लांबीचे एक्सप्रेस वे तयार करणार असल्याची घोषणा केल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र ते गोवा हा नवा इकॉनॉमिकल कॉरिडोर तयार होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नागपूर-गोवा समृध्दी महामार्गाची मार्गिका (दिशा) कोल्हापूर-गारगोटी पाटगांव अंजिवडे-धुऱ्याचीवाडी-माणगांव-सावंतवाडी मार्गे गोवा असा प्रस्तावित करणेबाबतची मागणी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३१ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर महामार्ग प्रस्तावित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (३१-०५-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
नागपूर - गोवा (पवनार-पात्रादेवी) महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्ग ८०२.५९२ कि.मी. लांबीचा महामार्ग करण्याचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत प्रस्तावित आहे.
(३) होय, हे खरे आहे.

(४) प्रस्तावित नागपूर गोवा (पवनार-पात्रादेवी) महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्गाची व्यवहार्यता तपासणी व भूसंपादनात सहाय्यासह सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याकरीता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत सल्लागाराची नियुक्ती करण्यात आलेली आहे. सल्लागाराने प्राथमिक अहवाल सादर केला आहे.तसेच,नागपूर गोवा (पवनार-पात्रादेवी) महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्गाची आखणी रेषा अंतिम करण्यात आली आहे.सदर द्रुतगती मार्गाचा विकास करण्याचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत हाती घेण्यास शासन मान्यता दिली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आर्वी-वर्धा महामार्गावरील नाले व पाईपद्वारे रस्ते प्रलंबित असल्याबाबत**

**(३६) ७५२३६ (०५-०३-२०२४). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आर्वी विधानसभा मतदार संघातील आर्वी-वर्धा महामार्गाचे काम पूर्णत्वास जात असून या ५३ कि.मी. रस्त्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याने रस्त्यावरील PQC लेअरला मोठ्या भेगा पडल्या आहेत, तसेच अनेक गावाजवळील वस्त्यांमधील पाणी वाहून जाण्याकरिता नालीचे बांधकाम करण्यात आले नसल्याने रस्त्याची उंची ही नागरी भागापेक्षा जास्त असून या वस्त्यांतील पावसाचे पाणी वाहून जाण्याचे मार्ग बंद झाल्यामुळे पाणी नागरिकांच्या घरात जाण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, आर्वी शहराजवळील जनता नगर, MSEB क्वॉटर जवळील वसाहतीत दोन्ही भागातील नाली व मौजा बेढोणा, सावळापूर, तळेगांव (रघूजी) येथे नाली बांधकाम करण्यात आली नसुन आर्वी ते खरांगणा या रस्त्यावर असलेल्या शेतकऱ्यांचे शेतात जाणारे रस्ते पुर्णत: बंद झाले असल्यामुळे त्या शेतकऱ्यांना शेतीकामाकरिता जा-ये करण्याकरिता मोठ्या अडचणी निर्माण झालेल्या आहे, तरी त्या शेतकऱ्यांना पाईपद्वारे रस्ते करुन देण्याबाबत मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या रस्त्यावरील पथ दिव्यांची व्यवस्था करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त रस्त्याची उच्चस्तरीय चौकशी करुन निकृष्ट दर्जाचा रस्ता निर्माण करणाऱ्या कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) तसेच उपरोक्त मार्गावरील दोन्ही बाजुच्या नाला व परिसरातील शेतकऱ्यांच्या शेत जमीनीकडे जाण्याऱ्या रस्त्यावर पाईप टाकुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास, त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०३-०६-२०२४) :** (१) सदर महामार्गाच्या कामाचा दर्जा मानकानुसार व निकषानुसार असल्याची खात्री प्राधिकृत अभियंता यांचेमार्फत करण्यात आलेली असून कामाचा योग्य दर्जा राखण्यात आलेला आहे.

तथापि, सदर महामार्गावर अल्प ठिकाणी भेगा पडलेल्या आहेत. भेगांच्या तीव्रतेनुसार कॉंक्रीट पॅनेल बांधण्याचे व आवश्यक तेथे उपाययोजना कंत्राटदारामार्फत स्वखर्चाने करण्यात येत आहेत.

रस्त्यावरील पाण्याचा निचरा करण्यासाठी कॉंक्रीट व कच्च्या नालीचे बांधकाम करारनाम्यातील तरतूदी व मानकानुसार करण्यात आले आहे. पाण्याचा निचरा योग्यप्रकारे होत आहे. सदर प्रकल्पांतर्गत असलेल्या नागरी भागामधील रस्त्याचे बांधकाम हे अस्तित्वातील रस्त्याच्या पातळीपेक्षा उंचीवर बांधण्यात आलेले नाही. रस्त्याचे बांधकाम झाल्यामुळे पावसाचे पाणी नागरिकांच्या घरात जात असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.
(२) हे खरे नाही.

आर्वी शहराजवळील जनतानगर, एम.एस.ई.बी. क्वार्टर्स जवळील वसाहतीतील दोन्ही भागातील नाली व मौजे बेढोणा, सावळापूर, तळेगाव (रघुजी) येथे करारनाम्यातील कामाच्या वावानुसार कॉंक्रीट नालीच्या बांधकामाचा समावेश नसल्याने कॉंक्रीट नालीचे बांधकाम करण्यात आलेले नाही. तथापि, सदर ठिकाणी कच्च्या नालीचे बांधकाम करण्यात

आलेले आहे.

आर्वी ते खरांगणा या रस्त्यावरुन शेतकऱ्यांच्या शेतात जाण्याकरिता असलेल्या अस्तित्वातील जोड रस्त्याची सुधारणा करण्यात आली आहे. त्यांचे स्थान बदलण्यात आलेले नाही अथवा बंद करण्यत आलेले नाही. अस्तित्वातील रस्त्यांना योग्य उतार व भराव टाकून सुधारणा करण्यात आली आहे. यामुळे शेतकऱ्यांना शेती कामास जाण्यास अडचण निर्माण झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) स्ट्रीट लाईटची व्यवस्था करारनाम्यातील वावानुसार व भारतीय रस्ते महासभा यांचे मानकानुसार पूर्ण करण्यात आली आहे.

(४) व (५) सदर महामार्गाच्या कामाचा दर्जा मानकानुसार व निकषानुसार असल्याची खात्री प्राधिकृत अभियंता यांचेमार्फत करण्यात आलेली असून कामाचा योग्य दर्जा राखण्यात आलेला आहे. आवश्यकतेनुसार व मागणीप्रमाणे ९०० मी.मी. व्यासाचे पाईप टाकून शेतकऱ्यांसाठी पोचमार्गाचे बांधकाम करण्यात आलेले आहे. याव्यतिरिक्त शेतकऱ्यांना त्यांचे शेतात जाण्याकरिता त्यांची मागणी व प्रत्यक्ष वस्तुस्थितीनुसार एकूण १९८ रस्ते बांधून देण्यात आलेले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा-वणी हायवे मार्गावरील शेंबाळ पाण्याखाली गेल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याबाबत

**(३७) ७५५४३ (०४-०३-२०२४). श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा-वणी हायवे मार्गावरील रस्त्याच्या कामामुळे शेंबाळ शेती शिवारातील शेती पाण्याखाली गेल्याने शेतक-यांचे नुकसान झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरोरा-वणी हायवे मार्गावरील रस्त्याच्या कामामुळे कंत्राटदाराने पाणी निचरा करण्यात न आल्याने शेंबाळ शेती शिवारातील शेती पाण्याखाली गेल्याने शेतकऱ्यांनी अग्रवाल कंपनीकडे नुकसान भरपाईची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०३-०६-२०२४) :** (१) हे खरे नाही.

सदर महामार्ग केंद्र शासनाचे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे अखत्यारीत येतो. शेंबळ शेती शिवारातील शेती वरोरा – वाणी रस्त्याच्या बांधकामामुळे पाण्याखाली गेली नसुन ती अतिवृष्टीमुळे पाण्याखाली गेल्याचे आढळून आले आहे. शेतांमध्ये पाणी जावू नये यासाठी दोन्ही बाजूला नालीचे खोदकाम केलेले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) रस्त्याच्या बांधकामामुळे पूर परिस्थिती निर्माण झालेली नाही. त्यामुळे प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे–बंगळूर महामार्गासह सेवा रस्त्यांची उंची १ ते २ मीटरने वाढविल्याने शे तजमीन खाली व महामार्ग उंच झाल्याबाबत

**(३८) ७५८४६ (०५-०३-२०२४). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे–बंगळूर महामार्गाच्या सहापदरीकरणाचे काम सुरु असून, महामार्गासह सेवा रस्त्यांची उंची १ ते २ मीटरने वाढविण्यात आल्याने शेतजमीन खाली व महामार्ग उंच अशी स्थिती निर्माण झाली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामार्गालगतच्या हजार एकर जमिनी महामार्गाच्या खाली गेल्या आहेत, त्यामुळे शेतातून शेतमाल, वाहने बाहेर काढणे अडचणीचे होणार असून पावसाचे पाणी शेतात साचून जमीन क्षारयुक्त होणार असल्याने ग्रामस्थ नाराज असून त्यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महामार्गाशेजारील २६ गावांमधल्या एक हजार एकर शेतातल्या शेतकऱ्यांना दरवर्षी रुपये पाच कोटी इतक्या रकमेचा फटका बसणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०३-०६-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.

सदर महामार्ग केंद्र शासनाचे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे अखत्यारित आहे.

पुणे-बंगलोर राष्ट्रीय महामार्गावरील पुणे ते सातारा या महामार्गाचे काम पूर्ण झालेले आहे. सातारा ते कागल या लांबीमध्ये माहे ऑगस्ट २०१९ व जुलै २०२१ या दरम्यान आलेल्या महापूरामध्ये एकूण १६ ठिकाणी महापूराचे पाणी राष्ट्रीय महामार्गावर आल्याने रा.म.क्र.४८ वरील वाहतुक ८ दिवस बंद होती. तांत्रिकदृष्ट्या विचार करुन पूर परिस्थितीमध्ये मुख्य महामार्ग व सेवा मार्ग अबाधित रहावा व महामार्गाची वाहतूक अखंडीत रहावी याकरिता सेवा मार्गाची व ठराविक ठिकाणी मुख्य महामार्गाची उंची लगतच्या जमीन पातळीपेक्षा सर्वसाधारणपणे १ ते २ मीटरपर्यंत वाढविण्यात आलेली आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

महामार्गालगत असलेल्या जमिनी ज्या ठिकाणी सेवा मार्गाच्या उंचीपेक्षा खाली आहेत, अशा ठिकाणी शेतातून शेतीमाल बाहेर काढण्याकरिता कंत्राटदारामार्फत आवश्यकतेनुसार भराव टाकून पोचमार्ग करुन देण्यात आले आहेत. पावसाच्या पाण्याचा निचरा होण्याकरिता ओढे/नाले/नदी या ठिकाणी आवश्यकतेनुसार पूल/मोऱ्यांची तरतूद ६ पदरीकरण प्रकल्पांतर्गत केली असल्यामुळे पाणी शेतात साचून राहील्याने जमीन क्षारयुक्त होण्याचा प्रश्न उद्भवत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे कुठल्याही प्रकारचे नुकसान होणार नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नांदगाव शहरातून जाणाऱ्या नव्या महामार्गावर सुसाट वेगाने धावणाऱ्या वाहनांना आळा घालण्यासाठी सुविधा उपलब्ध करण्याबाबत

**(३९) ७६११८ (०५-०३-२०२४). श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगाव शहराच्या मुख्य मध्यवस्तीतून तयार करण्यात आलेल्या नव्या महामार्गावर अवजड वाहनांची गर्दी वाढली असून या मार्गावरुन अवजड वाहने सुसाट धावत असल्याने शहरवासीयांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवजड वाहतुकीमुळे वाहतुक कोंडीचा प्रश्नही ऐरणीवर आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नांदगाव शहरातून जाणाऱ्या या नव्या महामार्गावर सुसाट वेगाने धावणाऱ्या वाहनांना आळा घालण्यासाठी दिशादर्शक फलक, रिफ्लेक्टर खांब, गतीरोधक इत्यादी तयार करण्यात यावेत अशी मागणी नागरीकांकडून संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांकडे करण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याप्रकरणी चौकशी करुन कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२८-०५-२०२४) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) नांदगाव शहरातून जाणाऱ्या एकूण ३ किमी लांबी मध्ये महामार्गावर वेगाने धावणाऱ्या अवजड वाहनांच्या गतीवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्थानिक नागरिकांच्या मागणीनुसार झेबरा क्रॉसिंग, गती रोधक, वेगमर्यादा फलक, माहिती दर्शक व दिशा दर्शक फलके लावण्यात आलेली आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी जिल्ह्यातील जिंतूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अशासकीय प्रशासक मंडळाच्या लेखा परीक्षणाबाबत**

**(४०) ७६४५२ (२५-०२-२०२४). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्ह्यातील जिंतूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये माहे जानेवारी, २०२० ते २०२२ पर्यंत कार्यरत असणाऱ्या अशासकीय प्रशासक मंडळाच्या कार्यकाळातील सन २०२१-२२ च्या लेखापरीक्षण अहवालात १७ गंभीर दोष आढळून आले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या १७ गंभीर दोषाच्या चौकशीसाठी तीन सदस्य समिती गठीत करण्यात आली असून समितीने तत्कालीन अशासकीय प्रशासक व सर्वच अशासकीय संचालक मंडळासह तत्कालीन रोखपाल, भूखंड विभाग प्रमुख आदींना नोटिसा बजावून तत्काळ खुलासा करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या चौकशी समितीने बजावलेल्या नोटीसांमध्ये भूखंड वाटप, भूखंड नामांतराची चौकशी व तब्बल १४ भूखंड धारकांना प्लॉट वाटताना रस्त्याची जागा कमी करुन सदर प्लॉटच्या मागील व महामार्गाच्या जागेतील जमीन घेऊन नवीन प्लॉट काढून वाटप करणे, वरुड रस्त्याच्या लगतची प्लॉट व्यतिरिक्त ३० बाय २० जागा भाडेतत्त्वावर देण्यापूर्वी १२ (२) ची मंजुरी न घेणे आदी बाबींचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने अशासकीय प्रशासक मंडळावरील चौकशी पूर्ण करुन दोषी असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०६-०५-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
विशेष लेखापरिक्षक वर्ग-२ सहकारी संस्था (फिरते पथक), परभणी यांनी त्यांचे दि.०५.०७.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कृषी उत्पन्न बाजार समिती, जिंतूरच्या सन २०२१-२२ चे लेखापरिक्षण अहवालातील गंभीर दोषांचा विशेष अहवाल सादर केला होता. तसेच सदर विशेष अहवालात नमुद मुद्द्यांच्या अनुषंगाने सखोल चौकशी करुन दोषींवर फौजदारी कार्यवाही करणेबाबत सहसंचालक (पणन), महाराष्ट्र राज्य, पुणे व सभापती/सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती, जिंतूर यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, परभणी यांना कळविले होते.
(२) होय, हे खरे आहे.
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, परभणी यांनी महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ४० अन्वये दि.११.०८.२०२३ रोजीच्या पत्रान्वये चौकशी करणेसाठी तीन सदस्यीय समितीचे आदेश निर्गमित केलेले असून जिंतूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे तत्कालीन प्रशासक मंडळ, सचिव, प्लॉट विभाग प्रमुख, रोखपाल व इतर संबंधितांना नोटीस बजावून खुलासा करण्याच्या सूचना दिलेल्या होत्या.
(३) होय, हे खरे आहे.
(४) चौकशी समितीने दि.०८.१२.२०२३ रोजी अहवाल सादर केला असून जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, परभणी यांनी दि.२९.१२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ४० (ई) व कलम ५३ अन्वये जबाबदारी निश्चित करण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीचे तत्कालीन अशासकीय प्रशासक मंडळ, सचिव व लेखापाल यांना नोटीस बजावली असून सुनावण्या सुरु केल्या आहेत. सदर

प्रकरणी सुनावण्या पूर्ण करुन संबंधितांनी सादर केलेले लेखी म्हणणे व तीन सदस्यीय समितीने सादर केलेला चौकशी अहवाल विचारात घेवून संबंधित दोषींविरुध्द मुद्देनिहाय जबाबदारी निश्चित करण्यात येवून नियमानुसार पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दृष्टी स्ट्रक्चरल इंजिनिअरिंग प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला काळ्या यादीत टाकणेबाबत**

**(४१) ७६४८४ (२९-०२-२०२४). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भारत सरकारच्या रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने केंद्रीय रस्ते निधी अंतर्गत रहाटे कॉलनी चौक ते खापरी रेल्वे ओव्हर ब्रिज पर्यंतच्या रस्त्याच्या काँक्रिटीकरणासाठी १२० कोटी रुपये मंजूर केले असून PWD (राष्ट्रीय महामार्ग विभाग), नागपूर, यांनी दृष्टी स्ट्रक्चरल इंजिनिअरिंग प्रायव्हेट लिमिटेड (डीएसईपीएल) ला काम दिले असून डीएसईपीएलने १२ महिन्यांत रस्त्याचे काँक्रिटीकरण, सायकलिंग ट्रॅक, फूटपाथ इत्यादी बांधायचे असून फेब्रुवारी, २०२३ मध्ये या कामांची अंतिम मुदत संपली असून नऊ महिने उलटूनही अद्याप काम पूर्ण झालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूरच्या PWD (राष्ट्रीय महामार्ग विभाग) संबंधित अभियंत्यांनी DSEPL वर कोणतीही कारवाई केली नसल्यामुळे डीएसईपीएल तसेच अभियंत्यांवर कारवाई होणे अपेक्षित असताना या प्रकरणामध्ये कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर काँक्रिटीकरणानंतर काही महिन्यांतच या रस्त्यावर मोठे खड्डे पडले असून रत्याच्या निकृष्ट दर्जाच्या कामांमुळे नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत असून तेथे अपघात होत आहेत, तसेच ह्या रस्त्यावर सायकलिंग ट्रॅक नसून फूटपाथ इत्यादी बांधकामाचा दर्जाही खराब आहे, सदर रस्त्यांची अवस्था वाईट आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त रस्त्यावर सायकलिंग ट्रॅकचा पत्ताच नाही, फूटपाथ इत्यादी बांधकामाचा दर्जाही खराब व रस्त्यांची अवस्था वाईट आहे स्त्याचप्रमाणे वर्धा रस्त्यासाठी मंजूर केलेला १२० कोटींचा जनतेचा पैसा जवळपास वाया गेला असून भारत सरकारचे तसेच महाराष्ट्र सरकार आणि नागपूर शहराचे मोठे आर्थिक नुकसान होत असून केवळ डीएसईपीएल आणि अभियंत्यांना या प्रकल्पाचा फायदा झाला असल्यामुळे डीएसईपीएलला काळ्या यादीत टाकणे अपेक्षित आहे, हे ही खरे आहे काय,
(५) उक्त प्रकरणी शासनाने संबंधित अभियंत्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०३-०६-२०२४) :** (१) रस्ते वाहतुक व महामार्ग मंत्रालय यांनी केंद्रीय रस्ते निधी अंतर्गत रहाटे कॉलनी चौक ते खापरी रेल्वे ओव्हर ब्रीज पर्यंतच्या रस्त्याच्या काँक्रीटकरनाने चौपदारीकरण करण्याचे रु.११४ कोटी रक्कमेच्या कामास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. सदर कामास दि. ८.१०.२०२१ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला व कामाची मुदत १५ महीने असून ती ७.१.२०२३ पर्यंत होती. सदर रस्ता नागपूर शहरातील प्रमुख अवागमानाचा रस्ता आहे. सदर काम करतेवळी वाहतुक विभागाद्वारे काम सुरु असलेल्या बाजूचा अर्धा रस्ता वाहतुकीस सुरु ठेवून उर्वरित रुंदीमध्ये काम करण्याची परवानगी वाहतूक विभागामार्फत देण्यात आली. जमिनीखालील इलेक्ट्रीक केबल्स, पाणी पुरवठा पाईपलाईन, काही ठिकाणी झाडांच्या फांद्या तोडणे, ट्राफीक सिग्नल इतरत्र स्थलांतरण करणे, या कामी परवानगी मिळण्यास विलंब झाल्याने या ठिकाणी प्रस्तावित कामे हाती घेणे शक्य झाले नाही. विधीमंडळ अधिवेशन सत्र, मा. पंतप्रधान महोदयांचा नागपूर शहर दौरा, मा. केंद्रीय गृहमंत्री यांचा दौरा, नागपूर शहरात पार पडलेला जी- २० मेळावा, क्रिकेट सामना इत्यादी प्रसंगी पोलीस विभागाकडून प्राप्त सूचनेनुसार त्या त्या वेळी कंत्राटदाराचे काम बंद ठेवावे लागले.
(२) उपरोक्त नमूद कारणांमुळे सदर काम विहीत मुदतीत पुर्ण न झाल्याने संबंधित अभियंत्यावर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) सदर काम रहाटे कॉलनी चौक किमी २/२०० ते खापरी रेल्वे ओव्हर ब्रीज किमी ८/२६० एवढ्या लांबी मध्ये करण्यात आले आहे. किमी ८/२०० ते किमी ७/५०० या लांबीमध्ये रस्ता सुस्थितीत आहे व कोठेही खड्डे पडलेले नाहीत. किमी ७/५०० ते किमी ८/२६० दरम्यान काही ठिकाणी कॉंक्रीट पॅनेल्स ना तडे गेलेले आहेत. आय. आर. सी. च्या विहित मानकानुसार कॉंक्रीट पॅनेल्सना बदलण्याचे काम कंत्राटदारामार्फत सुरु आहे. नवीन बांधकाम केलेल्या रस्त्याच्या पृष्ठभागावर खड्डे पडल्याने अपघात होण्याची बाब निदर्शनास आलेली नाही. फुटपाथ व सायकल ट्रॅकचे काम सुस्थितीत आहे व यावर नियमित आवागमन सुरु आहे.
(४) सदर लांबीमध्ये सायकल ट्रॅक व फुटपाथचे बांधकाम मानकाप्रमाणे झालेले असून त्यावरुन नियमित आवागमन सुरु आहे.
(५) रस्त्याच्या ज्या ठिकाणी तडे गेले आहेत, त्या भागात पुन: बांधकाम करण्यात येत असल्याने, आवश्यक ठिकाणी मानकाप्रमाणे दुरुस्ती करण्यात येत असल्यामुळे संबंधित अभियंत्यावर कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

---

### म्हसेपाडा (ता.वाडा/विक्रमगड, जि.पालघर) येथील रस्त्याअभावी ४२ दिवसांच्या बालिकेचा झालेला मृत्यू

**(४२) ७६६६६ (०४-०३-२०२४). श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गारगाई व पिंजाळ नदी बेटावर असलेल्या म्हसेपाडा (ता. वाडा, जि. पालघर) येथील ४२ दिवसांच्या बालिकेला रुग्णालयात नेतांना तिचा रस्त्याअभावी दुर्दैवी मृत्यू झाल्याचे दिनांक ११ जुलै, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, म्हसेपाडा गावची लोकसंख्या २०० ते २५० च्या आसपास असून शेजारील वाडा येथे ग्रामीण रुग्णालय व विक्रमगड तालुक्यातील मलवाडा येथे प्राथमिक आरोग्य केंद्र म्हसेपाड्यापासून दूर अंतरावर असून तेथे रस्ता नसल्यामुळे बालिकेचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच सदर पाड्यावर मोठी नदी असून या नदीपात्रात मागील वर्षी पुलाची मागणी करण्यात आली असून पूल मंजूर झाला नसल्याचे तेथील उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सांगण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, रस्ता व पुलाअभावी ग्रामस्थांचे व नागरिकांचे होणारे दुर्दैवी मृत्यू पाहता, शासनाने सदरच्या नदीपात्रात पुल बांधण्याबाबत वा रस्ता बांधकाम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२४-०५-२०२४) :** (१) होय,
(२) प्रश्नांकित ठिकाणी रस्ता व पूल उपलब्ध नाही. तथापि, ४ ते ५ कि.मी. अंतरावरुन पर्यायी मार्ग उपलब्ध आहे.
(३), (४) व (५) सदर ठिकाणी नवीन पुलाचे बांधकाम करण्यास निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून प्राधान्याने काम हाती घेण्याचे नियोजन राहील.

---

### शहापूर-मुरबाड तालुक्यांना जोडणारा संगम पुल धोकादायक झाल्याबाबत

**(४३) ७६८८२ (०५-०३-२०२४). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर व मुरबाड (जि.ठाणे) या दोन तालुक्यांना जोडणारा संगम पुल अतिशय जीर्ण होऊन त्या पुलाचे संरक्षण कठडे तुटले असल्यामुळे हा पूल अपघाताच्यादृष्टीने धोकादायक झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू पुल सन १९६२ रोजी पूर्ण झाला असून इतके वर्ष उलटूनही या पुलाचे अजूनही स्ट्रक्चर ऑडिट झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शहापूर-मुरबाड या मुख्य रहदारीच्या मार्गावरील या पुलावर मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ होत असून वाहनचालक व प्रवाशांमध्ये तसेच नागरिकांमध्ये असुरक्षितता-भितीचे वातावरण निर्माण होवून तीव्र संताप व्यक्त होत

आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वाहनचालक, प्रवासी तसेच नागरिकांच्या सुरक्षेच्यादृष्टीने या पुलाचे नव्याने बांधकाम करुन तत्काळ दुरुस्ती करण्याबाबत सातत्याने मागणी होत असूनही प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर पुलाची तत्काळ दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१५-०५-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) ऑक्टोबर २०२३ मध्ये सदर पूलाची संरक्षणात्मक पाहणी करण्यात आली आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) शेणवी किन्हवली सरळगाव नागाव कळभे प्रजिमा ६४ सा.क्र.कि.मी.१३/८०० येथील अस्तित्वातील पूल हायब्रिड ॲन्युटी योजनंतर्गत कामाच्या लांबीत समाविष्ट असून पूलाची देखभाल व दुरुस्ती करुन पूल वाहतुकीकरीता सुस्थितीत आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चिमूर-वरोरा व खडसंगी (जि.चंद्रपूर) येथील केसीसी कंपनी अंतर्गत राज्य महामार्गाच्या दोन्ही बाजूला केलेले नालीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(४४) ७७१७१ (०५-०३-२०२४). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिमूर-वरोरा व खडसंगी (जि.चंद्रपूर) येथील केसीसी कंपनी अंतर्गत राज्य महामार्गाच्या दोन्ही बाजूला केलेले नालीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याचे आरोप स्थानिक गावकरी करीत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे, तसेच नालीचे बांधकाम करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०३-०६-२०२४) :** (१) हे खरे नाही
सदर कॉंक्रीट नाली बांधकामाचे प्राप्त गुणवत्ता चाचणी अहवाल रस्ते वाहतुक व महामार्ग मंत्रालय, नवी दिल्ली यांचे मानकानुसार स्वीकारार्ह योग्य आहेत.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## धुळे येथील शिक्षण विभागात असलेली रिक्त पदे भरण्याबाबत

**(४५) ७७३०७ (२९-०२-२०२४). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे येथील शिक्षण विभागाच्या ३८ योजना एका छताखाली राबविण्यासाठी एक वर्षांपूर्वी स्वतंत्र योजना विभाग सुरु झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आकृतीबंधानुसार या विभागात वर्षभरापासून पुरेसे मनुष्यबळ नसून अनेक पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (२८-०५-२०२४) :** (१) होय
(२) होय. हे खरे आहे.
(३) गट-ब च्या पदावर नियुक्ती करीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शिफारशी प्राप्त झाल्या असून सदरचे उमेदवार प्रशिक्षण घेत आहे. प्रशिक्षणाअंती रिक्त पदे भरण्यात येतील. तसेच, सन २०२३ साठी गट-क संवर्गातील कनिष्ठ लिपिक पदे भरणेबाबतचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास यापूर्वीच सादर करण्यात आलेले आहे.

त्याचप्रमाणे, विभागाच्या अधिनस्त असलेल्या कार्यालयांचा आकृतीबंध दि.१७.०३.२००३ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आला होता. सदर कार्यालयांचा सुधारित आकृतीबंध मंजूर करण्याबाबतची कार्यवाही सुरु असून, त्याबाबतची नस्ती वित्त विभागास मान्यतेस्तव सादर करण्यात आलेली आहे.

विभागाचा आकृतीबंध अद्याप प्रलंबित असल्याने व पदभरतीचा शिथीलतेचा कालावधी समाप्त झाला असल्याने सदर पदांची पदभरती करण्यास मान्यता देण्याची विनंती वित्त विभागास करण्यात आली आहे.

तसेच, शासन निर्णय दिनांक २७.०२.२०२४ अन्वये सामाजिक व शैक्षणिक मागास वर्गाकरिता आरक्षणाची तरतूद केली असल्याने सन २०२४ चे मागणीपत्र सुधारित करुन विहित नमुन्यात सादर करण्याबाबत सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक यांना कळविण्यात आले आहे. त्याबाबतची पुढील कार्यवाही चालू आहे. त्याचप्रमाणे पदोन्नती व बदलीने रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मौजे सावंगी ते मिटमिटा या छत्रपती संभाजीनगर शहरासाठी बायपास रस्ता बांधण्याबाबत

**(४६) ७७३८६ (०४-०३-२०२४). श्री.हरिभाऊ बागडे (फुलंब्री) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे सावंगी ते मिटमिटा या छत्रपती संभाजीनगर शहरासाठी बायपास रस्ता करण्यासाठी सर्व्हे करण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रस्त्याचे काम कधी पर्यंत सुरु होणार आहे, याबाबत शासनाने काय उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०३-०६-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.
सद्यास्थितीत मौजे सावंगी ते मिटमिटा या छत्रपती संभाजीनगर शहरासाठी बाह्य वळण रस्ता करण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी निविदा सुचना माहे मार्च २०२४ मध्ये प्रकाशित करण्यात आली आहे.
(२) सदरील रस्त्याचे काम वार्षिक योजना आराखडा सन २०२४-२५ मध्ये प्रस्तावित करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पालघर जिल्ह्यातील नागरिक राज्य शासनाच्या विविध योजनांपासून वंचित असल्याबाबत

**(४७) ७७४४९ (०५-०३-२०२४). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागात कार्यरत असलेले अधिकारी वर्ग राज्य शासनाच्या विविध योजना राबविण्याच्या कामात वारंवार दुर्लक्ष व दिरंगाई करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शासनाच्या विविध योजना नागरिकांसाठी न राबविण्याची कारणे काय आहेत,
(३) तसेच पालघर/जव्हार येथील सार्वजनिक बांधकाम विभागातील संबंधित अधिकाऱ्यांच्या अकार्यक्षमतेमुळे राज्य शासनाचा करोडो रुपये निधी अखर्चित राहून तेथील नागरिकांचा विकास झालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर योजनांच्या कामात दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, याबाबत शासनाने संबंधितांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१५-०५-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील जीवनावश्यक वस्तूंच्या महागाईबाबत

**(४८) ७८११६ (२५-०२-२०२४). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई, कृषी उत्पन्न बाजार समिती व आसपासच्या शितगृहांमध्ये साठविलेल्या मालाची तपासणी शासनाने धडक मोहिमेच्या माध्यमातून अद्याप केलेली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किंमती नियंत्रणात ठेवण्याच्यादृष्टीने सन १९९५ मध्ये जीवनावश्यक वस्तू कायदा संमत करुन देखील साठेबाजारांवर केवळ कागदोपत्रीच कार्यवाही होत असल्याने महागाई आटोक्यात येण्यास अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच भिवंडीतील गोदामांवर दसरा दिवाळीच्या अगोदर अन्न व औषध प्रशासनाने व वैधमापन शास्त्र विभागाने धाड टाकून डाळी, साखर व तेलाचे साठे जप्त केले असता त्यात कमी वजनाची असंख्य पाकिटे सापडली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील जीवनावश्यक वस्तूंच्या महागाईवर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (०७-०५-२०२४) :** (१), (२) व (३) हे खरे नाही
(४) जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीवर नियंत्रण राहवे यासाठी, केंद्र शासनाच्या दि. १२.०६.२०२३ रोजीच्या अधिसूचनेन्वये गव्हाच्या घाऊक/ किरकोळ व्यापारी तसेच मिलर्स /इम्पोटर्सकरीता दि. ३१.०३.२०२४ पर्यंत साठा निर्बंध लागू करण्यात आले होते. त्याचप्रमाणे केंद्र शासनाच्या दि. ०२.०६. २०१३ रोजीच्या अधिसूचने नुसार तूर व उडद डाळींचे घाऊक / किरकोळ व्यापारी तसेच मिलर्स / इम्पोटर्सकरीता दि. ३१.१०.२०२३ पर्यंत लागू साठा निर्बंध लागू करण्यात आले होते. केंद्र शासनाच्या दि. ०६.११.२०२३ रोजीच्या अधिसूचनेन्वये सदरचे साठा निर्बध दि. ३१.१२.२०२३ पर्यंत लागू करण्यात आले होते. तसेच, साठेबाजी करणाऱ्या व्यापाऱ्यांविरूध्द कठोर कारवाई करण्याच्या संबंधित यंत्रणांना सुचना देण्यात आल्या असून, केंद्र शासनाच्या उपरोक्त निर्देशानुसार राज्य शासनाच्या पुरवठा यंत्रणेकडून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देवरूख-मारळ-बामणोली-ओझरे वाहतुकीसाठी खराब झाल्याबाबत**

**(४९) ७८४३६ (२८-०२-२०२४). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवरूख-मारळ-बामणोली-ओझरे मार्ग हा कोकणातील प्रसिद्ध मार्लेश्वर देवस्थानाला जाणारा रस्ता वाहतुकीसाठी खराब झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता दुरुस्तीसाठी स्थानिक नागरिकांनी विभागाकडे विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कार्यवाही करुन संबंधित दोषींविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२८-०५-२०२४) :** (१) होय.

(२) होय.

(३) सदर रस्त्याची एकूण लांबी ५७.६० कि.मी. आहे. या पैकी ५०.१० कि.मी.लांबी सुस्थितीत असून ५.०० कि.मी. लांबी डांबरीकरणाचे काम प्रगतीत आहे. उर्वरित २.५० कि.मी. लांबीत वार्षिक देखभाल व दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत रस्त्याची देखभाल व दुरुस्तीची कामे वेळोवेळी करुन रस्ता वाहतूकीकरिता सुस्थितीत ठेवण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**प्रसिद्ध संत श्री बाळु मामा देवस्थान, आदमापुर (जि.कोल्हापूर) येथील रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(५०) ७९३०७ (०६-०२-२०२४). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रसिद्ध संत श्री बाळु मामा देवस्थान, आदमापुर (जि.कोल्हापूर) येथील रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाल्याने नागरीकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या दुरुस्तीबाबत स्थानिक प्रशासनास व सार्वजनिक बांधकाम विभागाकडे स्थानिकांनी अनेकवेळा तक्रारी करुनही अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर रस्त्याची तातडीने दुरुस्ती करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१५-०५-२०२४) :** (१) हे खरे नाही, रस्त्याच्या सदर लांबीत रुंदीकरण व क्रॉक्रीटीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले असून रस्ता वाहतूकी करीता सुस्थितीत आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई